दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.३० जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २४४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 30 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 244 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

# मंत्रिमंडळ बैठकीत वादग्रस्त मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांचा इशारा

## फडणवीसांनी आधी निर्णय घेतले नंतर मंत्र्यांचा क्लास,सक्त ताकीद

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज झाली. या बैठकीमध्ये विविध महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. मात्र, बैठकीला वादग्रस्त मंत्री माणिकराव कोकाटे यांची उपस्थिती हा चर्चेचा विषय राहिला आहे. राज्यात महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यासाठी गोंदिया, रत्नागिरी आणि वाशीम येथे विशेष न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीमध्ये महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. मात्र बैठकीनंतर सर्व अधिकारी सभागृहातून बाहेर पडले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी सर्व मंत्र्यांचा चांगलाच क्लास घेतला. यावेळी वादग्रस्त मंत्र्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी कडक शब्दात इशारा दिला आहे.

या पुढे वादग्रस्त मंत्र्यांचा एकही प्रकार खपवून घेणार नसल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. ही अखेरचा संधी असल्याचे देखील फडणवीस यांनी मंत्र्यांना सांगितले आहे. मंत्रिमंडळ बैठक संपल्यानंतर वीस मिनिटे मुख्यमंत्र्यांनी सर्व मंत्र्यांचा चांगलाच क्लास घेतला. यावेळी त्यांनी वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या मंत्र्यांचे कान टोचले आहेत.



### माणिकराव कोकाटे यांची उपस्थिती चर्चेचा विषय

मंत्रिमंडळ बैठकीत वादग्रस्त मंत्री माणिकराव कोकाटे यांची उपस्थिती बाहेर चर्चेचा विषय ठरली होती. माणिकराव कोकाटे यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा, यासाठी विरोधी पक्षाने राग उठवले आहे. त्यामुळे आज ते राजीनामा देतील अशी शक्यता वर्तवली जात होती. बैठकीआधी त्यांनी अजित पवार यांना दालनात उपमुख्यमंत्र्यांसोबत चर्चा केली. यावेळी दोघांमध्ये एक तास चर्चा चालली. मात्र त्यानंतर कोकाटे थेट मंत्रि मंडळाच्या बैठकीसाठी दाखल झाले. यावेळी प्रसार माध्यमांनी विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाला कोकाटे यांनी उत्तर दिले नाही.



स्व.महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस आ.रोहितदादा पवार , आमदार संदीप भैया क्षीरसागर, राजेंद्र मस्के यांनी भेट घेतली. स्व.महादेव मुंडे यांची निर्घुण हत्या होऊन अनेक महिने झाले तरी त्यांच्या मारेकऱ्यांवर कोणतीही कारवाई झालेली दिसून येत नाहीये. स्व. मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी आम्ही सर्व त्यांच्या पाठीशी असून या लढ्यात आम्ही देखील सामील आहोत अशी भूमिका या भेटीवेळी व्यक्त केली.

# आता कर्मचाऱ्यांना सोशल मीडियासाठी नियमाची 'चौकट'

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाकडून मोठा निर्णय घेण्यात आला आहे. गोपनीय शासकीय माहितीचा प्रसार करणं, खोट्या गोष्टी सोशल मीडियाद्वारे पसरविणे, शासकीय नियमांचं उल्लंघन करुन समाज माध्यमांवर प्रतिक्रिया व्यक्त करणं यासह अनेक बाबी टाळण्यासाठी शासनाकडून नव्याने सूचना जाहीर करण्यात आली आहे.शासकीय सूचनांचं पालन न केल्यास कर्मचाऱ्याला शिस्तभंगकारवाईला सामोरे जावं लागणार आहे.

नव्या सूचनांचे परिपत्रक जाहीर करण्यात आलं आहे. याद्वारे आता शासकीय कर्मचाऱ्यांना गोपनीय शासकीय माहितीचा प्रसार करणं, खोट्या गोष्टी





सोशल मीडियाद्वारे पसरविणे, शासकीय नियमांचं उल्लंघन करुन समाज माध्यमांवर प्रतिक्रिया व्यक्त करण्यासंदर्भात सूचना जाहीर केल्या आहेत. या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले की, शासकीय कर्मचाऱ्यांनी फेसबुक, एक्स (पूर्वीचे ट्विटर), इन्स्टाग्राम, यूट्यूब, व्हॉट्सअँप यासारख्या माध्यमांवर व्यक्त होताना किंवा पोस्ट करताना शासनाच्या धोरणांचे उल्लंघन होता कामा नये.गोपनीय माहिती सार्वजनिक करणं, शासनविरोधी खोट्या किंवा अप्रामाणिक माहितीचा प्रचार करणं, तसंच, जाती, धर्म, भाषा, प्रांत किंवा सामाजिक गटांमध्ये तेढ निर्माण करणाऱ्या टिप्पणी अथवा मजकुराचे प्रसारण यावर बंदी घालण्यात आली आहे. तसंच, शासकीय कर्मचाऱ्यांनी आपल्या वैयक्तिक खात्यावरून शासकीय निर्णयांविषयी टीका किंवा गैरसमज निर्माण करणारे पोस्ट करू नयेत. कोणतीही माहिती प्रसारित करण्यापूर्वी ती शासनाने अधिकृतपणे जाहीर केली आहे का? याची खातरजमा करणे आवश्यक आहे.या सर्व गोष्टी करताना खातरजमा केल्यामुळे एकाकी माहिती ही प्रसारित होणार नाही आणि चुकीचा संदेश देखील जाणार नाही याची खबरदारी घेणं महत्वाचं आहे. दरम्यान, या नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची प्रक्रिया राबवली जाईल, असा इशारा परिपत्रकात देण्यात आला आहे. यामध्ये सेवा नियमांचं उल्लंघन केल्यास निलंबन, वेतन कपात, पदोन्नती थांबविणे यासारख्या कारवायांचा समावेश असू शकतो.

# सार्वजनिक बांधकाम विभागाचा अजुन एक प्रताप उघडकीस अर्धवट काम करून रस्ता हस्तांतरित करण्याचा अट्टाहास

**शिरूर (पुणे) । भाऊसाहेब पंधरकर**

शिरूर शहरातील मेन रस्ता कोट्यावधी रूपय खर्च करून शिरूर शहराला एक चांगले वैभव प्राप्त करण्यासाठी झालेला चांगला प्रयत्न.पण याला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी चुकिच्या पद्धतीने कामे करून शिरूर शहरातील नागरिकांची व शासनाची फसवणूक केलाचा प्रताप उघडकीस.नाथाभाऊ पाचर्णे यांनी रस्ता दुभाजकाचे कामं अपुर्ण का? या बाबत शिरूर नगरपरिषदे कडे चौकशी केली असता हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल आहे ते त्यांनी पुर्ण केले पाहिजे असे उत्तर मिळाले.

त्या प्रमाणे नाथाभाऊ पाचर्णे यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग शिरूर यांना रितसर १६ जुन २०२५ रोजी पत्र देऊन सदर दुभाजकाचे अपुर्ण कामं पुर्ण करण्यास



सांगितले.सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांनी सुरवातीला अंग झटकायचे काम केले.सदर अपुर्ण कामाची जबाबदारी एक मेकांन वर ढकलून प्रशासन या बाबत चालढकल करत असल्याचे पहाण्यास मिळाले.सदर रस्ता पुर्ण होऊन दोन वर्षे होऊन गेली पण अजून पर्यंत दुभाजकाचे कामं अपुर्णच आहे.

या मध्ये खालील प्रश्न उपस्थित होत आहेत.

१)सदर काम अपूर्ण असताना सार्वजनिक बांधकाम उपविभाग हा रस्ता हस्तांतरित करण्याचा प्रयत्न का करत आहे.

२)सदर अपुर्ण कामाचे बिल पुर्ण काढले आहे का?

३)जर ठेकेदाराने वेळेवर काम केले नाही तर त्या ठेकेदारावर सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणती कार्यवाही केली.

४)या अपुर्ण कामा मध्ये कोणा-कोणाचा फायदा झाला आहे?

शिरूर शहरातील मेन रस्ता जो दिवसभर शिरूर शहरातील व तालुक्यातील नेते मंडळी,कार्यकर्ते ,सर्व समाज बांधव रोज पाहतात अश्या रस्त्याच्या कामात सर्वांन समोर सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांनी भ्रष्टाचार तर केला नाही ना हा प्रश्न सामान्य जणतेला भेडसावत आहे.तरी सदर अपुर्ण काम पुर्ण करून संबधीत कामाची प्रशासनाने चौकशी करून दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मा.नाथाभाऊ शिवराम पाचर्णे यांनी केली आहे.






# ‘वारसा’ जपण्याचा ध्यास

वारसा... एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे सुपूर्द केला जाणारा खजिना. मग तो ज्ञानाचा असो, अनुभवाचा, कलेचा किंवा परंपरेचा. हा वारसाच माणसाचं आयुष्य समृद्ध आणि सुसंस्कृत बनवतो. कोल्हापूरसारख्या ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणी तर कला, क्रीडा, परंपरा, इतिहास या साऱ्याचा वारसा अनेकविध रूपांमध्ये दिसतो. एकीकडे आसमंतात पन्हाळगड-विशाळगडसारखे शौर्यगाथांचे खंबीर साक्षीदार, तर दुसरीकडे मातीतल्या कुस्तीसारख्या खेळाची रग अंगात भिनलेली... या अशा मातीत छत्रपती शिवरायांसारख्या द्रष्ट्या सेनानीने रुजवलेली ‘शिवकालीन युद्धकला’ फुलली नसती तरच नवल!बलाढ्य आणि शस्त्रसज्ज मुघल सेनेशी मोजके मावळे आणि तुटपुंजी शस्त्रं घेऊन लढताना शिवरायांनी गनिमी काव्याचा अफलातून वापर केला. यासाठी शिवरायांनी जी शस्त्रविद्या विकसित केली, तीच शिवकालीन युद्धकला. पुढे इंग्रज राजवटीत युद्धासाठी तिचा वापर थांबला, तरी कला म्हणून ती जिवंत राहिली; किंबहुना कित्येक वस्तादांनी आपलं आयुष्य खर्ची घालून ती जिवंत ठेवली. आज मात्र या समृद्ध वारशाला काहीशी उतरती कळा लागली असून शासकीय आणि एकूणच अनास्थेमुळे इतका अमूल्य ठेवा उपेक्षित आणि दुर्लक्षित राहिला आहे...

हे सगळं एका तरुण सर्जनशील कलावंताच्या नजरेस पडलं. हा तरुण मूळचा कोल्हापूरचाच. मुंबईत एका प्रथितयश जाहिरात संस्थेत अनेक वर्षे काम केल्यानंतर आपल्या गावात राहून आपल्याला भावणाऱ्या विषयांवर काम करावं हा ध्यास घेतलेला. त्याचं नाव सचिन सूर्यवंशी. कोल्हापूरकरांचं अलौकिक फुटबॉलप्रेम हा विषय घेऊन त्यानं माहितीपट बनवला, ‘द सॉकर सिटी’. या माहितीपटाला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. या पुरस्कारानं त्याचा आणि त्याच्या साथीदारांचा हुरूप वाढला. त्यानंतर अचानक त्याच्यासमोर विषय आला तो म्हणजे मर्दानी खेळ, अर्थात ‘शिवकालीन युद्धकला’. आपल्या चिकित्सक स्वभावाला अनुसरून सचिननं त्या विषयाच्या अभ्यासात स्वतःला झोकून दिलं. या विषयावर एक सखोल माहितीपट करण्याची गरज आहे, हे त्याला जाणवलं. मग या विषयाशी संबंधित वाचन, संशोधन, त्यातील तज्ज्ञ व्यक्तींच्या भेटीगाठी अशी सगळी तयारी करून कामाला सुरुवात झाली. पाठीशी कुणी मोठा निर्माता किंवा आर्थिक पाठबळ नसलं तरी प्रचंड ध्यास आणि मित्रांचा मदतीचा हात या भांडवलावर काम सुरू झालं. मर्यादित साधनं, विशेषतः आर्थिक मर्यादा लक्षात घेत काटेकोर नियोजन करून काम करणं आवश्यक होतं.

काही गोष्टी चित्रित करण्यासाठी मोठा कॅमेरा आवश्यक असला तरी सतत कॅमेरा भाड्यानं घेणं परवडणार नाही, हे लक्षात घेऊन काही भाग हा मोबाइल फोनचा कॅमेरा वापरून शूट करायचं ठरलं. अर्थात मोबाइलचा कॅमेरा आणि विशेषतः माईक यांच्या मर्यादा हे महत्त्वाचं आव्हान पेलायचं होतं. हा माहितीपट असला तरी फक्त लोकांच्या मुलाखती घेऊन आणि शस्त्रांची छायाचित्रं टाकून विषय संपवायचा नव्हता. शस्त्रं चालवतानाचे शॉट्स, त्यामागील सुरसरम्य कथा सांगणारी मंडळी, मर्दानी खेळ शिकवणारे वस्ताद, शिवाय या खेळाचा इतिहास, त्यात शिवरायांपासून महाराणी ताराराणी ते राजर्षी शाहू महाराज या सर्व थोर व्यक्तींचं योगदान असा खूप मोठा पट मांडायचा होता; तोही मर्यादित कालावधीत आणि परिणामकारक पद्धतीनं. यातील काही भाग (उदा. शिवरायांच्या मावळ्यांचे प्रसंग, त्यांची मनःस्थिती) हा काल्पनिक (फिक्शन) पद्धतीनं दाखवायचं ठरलं; तर जिजाऊंपासून बाजीप्रभू देशपांडे यांच्यापर्यंत पराक्रमाच्या गाथा निमेशनच्या माध्यमातून मांडायचं ठरलं.आणि एक दिवस अचानक मला सचिनचा फोन आला. ‘मी सध्या एका माहितीपटावर काम करत आहे. आपण दोघांनी एकत्र काम करावं, अशी अनेक वर्षांपासूनची इच्छा आहे. या माहितीपटात शस्त्रांचे आवाज आणि एकूणच ध्वनीची महत्त्वाची भूमिका आहे. तेव्हा तू हे काम करावंस असं मला वाटतं.’ त्याआधी मी सचिनशी माझी फक्त एकदाच भेट झालेली. पण एका भेटीतच आमचे सूर जुळलेले. त्याच्यासोबत काम करण्याची संधी मलाही हवीच होती...मग ‘वारसा’च्या साऊंडवर चर्चा झाली. माहितीपटात दिसणाऱ्या सर्व शस्त्रांचे आवाज रेकॉर्ड करायचे होते, त्याशिवाय फिक्शन, निमेशन भागांसाठी ध्वनीसंयोजन करायचं होतं. शस्त्रांचे आवाज रेकॉर्ड करणं हे वरकरणी सोपं वाटलं, तरी प्रत्यक्षात आव्हानात्मक काम आहे. मर्दानी खेळासाठी वापरली जाणारी अस्सल शस्त्रं, ती चालवता येणारे जाणकार, आजूबाजूला कसलाही गोंगाट नसलेली शांत जागा, हे आवाज रेकॉर्ड करण्यासाठी योग्य साऊंड इक्विपमेंट (उत्तम रेकॉर्डर आणि दर्जेदार स्टीरिओ माईक) अशी सर्व जुळणी करून कामाला सुरुवात केली.

कोल्हापूरजवळ असलेलं सव्यसाची गुरुकुल हे एक भन्नाट ठिकाण आहे. तिथे मर्दानी खेळ आणि एकूणच भारतीय खेळांविषयी शालेय वयापासूनच विद्यार्थ्यांना सर्वांगीण प्रशिक्षण दिलं जातं. तिथले प्रमुख लखन जाधव हे या विषयातले केवळ जाणकार नव्हे, तर या विषयाला वाहून घेतलेले समर्पित अभ्यासक आहेत. त्यांनी आम्हांला सर्व शस्त्रांचा परिचय करून दिला आणि त्यांचे आवाज योग्य प्रकारे रेकॉर्ड करण्यात मोलाची मदत केली. हे काम माझ्यासाठी खरोखर संस्मरणीय ठरलं. तलवारीचं धारदार पातं जेव्हा माईकपासून दोन इंचावरून हवा कापत जातं, किंवा पट्ट्याच्या लवलवत्या पात्यानं जेव्हा निमिषार्धात लिंबाचे दोन भाग होतात, तेव्हा हेडफोन्समध्ये ऐकू येणारा आवाज एकाच वेळी सुखावणारा, अंगावर काटा आणणारा आणि धडकी भरवणारा असतो!अशा प्रकारे शस्त्रांचे आवाज ‘ऑथेंटिक’ पद्धतीनं रेकॉर्ड करता आले. ते माहितीपटात योग्य प्रकारे लावण्याच्या कामात माझा सहकारी उमाकांत जगताप यानं मदत केली. माहितीपटाला डॉ. शरद भुताडिया यांच्यासारख्या मातब्बर कलाकाराच्या आवाजात निवेदन मिळालं. तर आमचा मित्र सुविख्यात संगीतकार आणि संगीतसंयोजक अमित पाध्ये यानं समर्पक असं पार्श्वसंगीत दिलं. या संगीतातून तो काळ आणि माहितीपटामागील विचार दोन्ही यथायोग्य रीतीने पोहोचतात. शेवटी या सर्व गोष्टी एकत्र करून त्याचे सुयोग्य मिश्रण (मिक्सिंग) करणं, ही आनंददायी प्रक्रिया म्हणजे शेवटचा टप्पा!यथावकाश माहितीपट तयार झाला आणि अल्पावधीतच त्याला ‘फिल्मफेअर’ पुरस्कार मिळाला! सर्वांना आनंद झाला. मात्र मनातून वाटत होतं, की याला राष्ट्रीय पुरस्कार मिळायला हवा, इतका महत्त्वाचा विषय मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचायला हवा. आणि तेही घडलं! गेल्या आठवड्यात जाहीर झालेल्या राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये ‘वारसा’ला ‘नॉन-फीचर’ प्रकारात ‘कला आणि संस्कृती यावरील सर्वोत्कृष्ट लघुपट’ हा बहुमान मिळाला. या मातीतल्या, महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासातल्या एका महत्त्वाच्या विषयावरील माहितीपट राष्ट्रीय पातळीवर नावाजला गेला. मनापासून, झोकून देऊन फिल्म बनवणाऱ्या सचिनच्या आणि आमच्या संपूर्ण टीमच्या मेहनतीचं चीज झालं. आता सचिननं हाती घेतलेल्या इतर प्रकल्पांचं काम पूर्णत्वास जायला या पुरस्कारानं बळ मिळेल, अशी आशा आहे.मुख्य म्हणजे, या माहितीपटातून ज्या शिवकालीन युद्धकलेची अर्थात मर्दानी खेळाची सद्यस्थिती मांडली आहे, त्या खेळाला ऊर्जितावस्था मिळावी हीच यानिमित्ताने प्रार्थना. शालेय अभ्यासक्रमातील क्रीडाप्रकारांमध्ये या मर्दानी खेळाचा समावेश व्हावा, ही आम्हा सर्वांची इच्छा असून सचिनचे त्या दृष्टीनं प्रयत्न देखील सुरू आहेत. ते ज्या दिवशी घडेल, त्या दिवशी हा माहितीपट आणि त्याला मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार खऱ्या अर्थानं सत्कारणी लागेल.

# चातुर्य शहाणें झालें...

आधुनिक मनोविकारशास्त्रावरची मान्यताप्राप्त पुस्तके लिहिली पाश्चिमात्य संशोधकांनी. मॉडर्न मेडिसिनचा उगम तिथला. आमचे रुग्ण इथले! पाश्चात्य समाजात व्यक्तीच्या अंतस्थ प्रेरणा, इच्छा, भावना यांचा मुक्त आविष्कार हा त्यांच्या स्वभावाचा सर्वमान्य गाभा. या उलट पौर्वात्य संस्कृतीत माणूस हा या समाजसंस्थेचा एक पूरक घटक आहे. संस्कृती केंद्रस्थानी, माणूस तिच्या नियमांनी बांधलेला. पाश्चिमात्य समाजात व्यक्ती केंद्रस्थानी, पौर्वात्य संस्कृतीत समष्टी. कुठले चांगले कुठले वाईट हा प्रश्न नाही, हा संस्कृतीतला मूलभूत फरक.



रुग्ण डॉक्टरकडे विकृती घेऊन येतो तशी संस्कृतीही घेऊन येतो. मानसिक विकारांत तर रुग्णाची लक्षणे, विकाराचे स्वरूप आणि उपचाराची दिशा सारेच त्याच्या सांस्कृतिक मानमान्यतेच्या रंगात भिजलेले. आफ्रिकेपासून अमेरिकेपर्यंत जगभरात कुणालाही होवो, मोतीबिंदू आणि कर्करोगाची लक्षणे आणि उपचार यांत फरक नाही; मात्र स्किझोफ्रेनियात होणारे भास-भ्रम, त्यांचे स्वरूप, उपचाराची दिशा यावर रुग्णाच्या पारंपारिक समजुती आणि संस्कृती याचा मोठा प्रभाव पडतो. सुशिक्षित, शहरी माणसांवर कमी पडत असेल, अर्धनागरी रुग्णांवर अधिक असेल. लोक माझ्या विरुद्ध आहेत, कुणी माझ्या वाईटावर आहे, असे संभ्रम संशयी स्किझोफ्रेनियात नेहमी दिसतात. मात्र छोट्या गावात अगदी शारीरिक आजार झाला तरी असे संशय जवळजवळ प्रत्येकजण व्यक्त करतो. ती त्यांची परंपरेने चालत आलेली विचारसरणी. त्याचा स्किझोफ्रेनियाशी संबंध जोडावा की जोडू नये हे ठरवणे, उपचारातही अशा समजुतींचा उपयोग रुग्णाच्या भल्यासाठी करता येणे ही सूज्ञता. दरवेळी ती डॉक्टरच दाखवतो असे नाही, रुग्णाचा हुशार नातेवाईकही दाखवतो!

माझ्याकडे एक माणूस आपल्या तरुण मुलीला स्किझोफ्रेनियाच्या उपचारासाठी घेऊन येई. तिला वर्षा-दोन वर्षाला त्रास होत असे. औषधोपचार केला की ती त्वरित बरी होऊन परत जाई. दरम्यान, त्याने तिचे लग्न लावून दिले. मुलगी सासरी गेली. वर्षभरात तिला पुन्हा झटका आला. बाप लगेच धावला, सासरहून पोरीला उचलून थेट माझ्याकडे आला. नेहमीप्रमाणे काही दिवसांत ती पूर्ण बरी झाली. मी विचारले, तू जावयाला, व्याह्याला काय सांगितलेस? तो म्हणाला मी त्यांना आधीच कल्पना दिली आहे, की आमच्या घराण्यावर करणीचा प्रभाव आहे. त्याचा त्रास वर्ष-दोन वर्षाला आमच्या मुलीला भोगावा लागतो. पण काळजी करू नका, मी लगेच त्याचा बंदोबस्त करून टाकत जाईन! उपचार तुमच्याकडेच, कारण हा आजार आहे हे मला पक्के ठाऊक आहे. मनोविकारांच्या वर्गीकरणाची अमेरिकास्थित सर्वोच्च संस्था आपल्या ‘डायग्नोस्टिक अॅन्ड स्टॅटिस्टिकल मॅनुअल’च्या ताज्या पाचव्या आवृत्तीत काय म्हणते? ‘मनोविकार हे माणसांच्या संस्कृतीशी बांधले गेले असल्याने, त्यांचा उपचार करताना रुग्णाच्या बिलिफ सिस्टीमचा, म्हणजे थोडक्यात त्याच्या पारंपारिक समजुतींचा उपयोग करून घेतला पाहिजे.’ या बापाने पोरीचा संसार सुरळीत व्हावा म्हणून दुसरे काय केले? पाव शतकाच्या प्रवासात निघालेला हा निष्कर्ष.

मानसशास्त्राचा उगम तत्त्वज्ञानातून झाला. तत्त्वज्ञान हा रोजच्या जगण्याचा गाभा, मात्र विनोबा म्हणतात तसे ‘तत्त्वज्ञान हे म्हातारपणी वाचायचे असते या समजुतीमुळे तारुण्य आणि तत्त्वज्ञान दोन्ही वाया जाते!’ आत्मस्वीकार ही अनेक मानसिक समस्यांवर उताऱ्याची पाहिली पायरी, मात्र त्यासाठी तत्त्वदृष्टी हवी.

मेंदूतील लिंबिक सिस्टीम हे भावनेचे केंद्र तीस कोटी वर्षांपूर्वीचे, तर पूर्व-प्रमस्तिष्क हे तर्कबुद्धीचे केंद्र फक्त दोन कोटी वर्षांपूर्वीचे. म्हणून तर्काधारित विचारवृत्तीवर भावना प्रभावी ठरतात हेही लक्षात ठेवणे गरजेचे.

मानसिक विकार हे मेंदूतील रसायनांच्या असमतोलामुळे होतात हे खरे, पण या न्युरोट्रान्समिटर्सवर भोवतालच्या घटनांचा, आणि त्या घटना आमच्या मनात कसे तरंग निर्माण करतात याचा निश्चित परिणाम होतो. समजुती अवैज्ञानिक असतील, पण त्यांच्या परिणामाचे एक विज्ञान आहे. त्या तथ्यहीन असतील, पण त्यांचा मनावर घडून येणारा परिणाम मात्र तथ्यपूर्ण असतो, बरा किंवा वाईट दोन्ही अर्थाने. संपूर्ण वैज्ञानिक प्रयोगांनी सिद्ध केलेल्या औषधांना ‘प्लेसिबो’ इफेक्टच्या कसोटीतून जावे लागते, तो प्लेसिबो इफेक्ट काय? वैद्यकशास्त्रात एखाद्या औषधाची उपयुक्तता सिद्ध करायची असली तर त्याचा प्रयोग करताना सहसा रुग्णांचे दोन किंवा तीन गट पाडले जातात. एका गटाला खरे औषध, एका गटाला कुठलेच औषध नाही आणि एका गटाला औषधाच्या जागी कुठलीही उपयुक्तता नसलेली, निरुपद्रवी साखरेची गोळी देण्यात येते. अशा निरुपद्रवी औषधाला ‘प्लेसिबो’ म्हणतात. या प्लेसिबोमुळे अनेक आजारात रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ३० ते ५० टक्के एवढे दिसून येते. ‘खरे औषध’ प्लेसिबोपेक्षा सांख्यिकीदृष्ट्या जास्त प्रभावी असेल तरच ते उपयुक्ततेची कसोटी पार करते असे समजले जाते. सहसा मानसिक आजारात प्लेसिबो परिणाम जास्त दिसून येत असला तरी माणसाला ग्रासणाऱ्या अतिरक्तदाबापासून कर्करोगापर्यंत सगळ्याच प्रकारच्या शारीरिक आजारात, आपण औषधाने बरे होणार या कल्पनेने माणसांना कमी-अधिक प्रमाणात बरे वाटू लागते हे शास्त्रीय सत्य आहे. शरीरावर चेतासंस्थेचे नियंत्रण आणि चेतासंस्थेवर मेंदूचे, पर्यायाने मनाचे नियंत्रण; त्यामुळे आपली इच्छाशक्ती, स्व-जाणीव, अपेक्षा इत्यादींच्या एकत्रित परिणामातून माणूस व्याधीमुक्त होतो.

प्लेसिबो इफेक्ट फक्त औषधापुरता मर्यादित नाही. डॉक्टरचा रुग्णांसोबत घडून येणारा संवाद उपचारावर आणि दुरुस्तीवर प्रभाव टाकणारा महत्वाचा घटक. रुग्ण, अमुक डॉक्टरच हवा असे का म्हणतात? कारण, तोच मला ठीक करेल, ही समजूत. यात त्या डॉक्टरचे कौशल्य, अनुभव, ज्ञान जितके महत्वाचे, तितकाच रुग्णाचा विश्वास. शेवटी समजुती या सामुहिक अनुभूतीतून आलेल्या असतात. चार लोक त्याला सांगतात, अमुक डॉक्टरने मला याहीपेक्षा मोठ्या व्याधीतून दुरुस्त केले आहे.

मनोविकारांची लक्षणे कधीकधी एखाद्या खोल डोहाच्या पृष्ठभागावर उमटलेले तरंग असतात. ते वरवर जसे दिसतात, जसे दाखवतात तशी नसतात. त्यासाठी तज्ज्ञाला रुग्णाची नुसती मानसिकता नाही, प्र-मानसशास्त्र शोधावे लागते. मेटा सायकॉलॉजी. मानसिकतेची मानसिकता. त्याला रूढ निदानाच्या पलीकडे जाता आले पाहिजे. ते अनुभवाने येते. चिंतनाने येते. दुर्दैवाने सगळ्यांना येते असे नाही.

कुत्र्याची भीती वाटणे हे मर्यादेत नॉर्मल. कुत्र्याची अकारण, अवास्तव भीती वाटणे हा फोबिया, मानसिक समस्या. मात्र मनाच्या खोल डोहात दडलेला अपराधभाव, त्यामुळे निर्माण होणारी दुश्चिंता (एंक्झायटी), ती कमी करण्यासाठी आत्मपीडेची सुप्त प्रेरणा हे व्यक्तीचे प्र-मानसशास्त्र. कुत्रा चावण्याच्या प्रकट दुर्भितीच्या तळाशी आत्मपीडेची सुप्त इच्छा वावरत असू शकते याचा थांग कुणाला लागेल? ग्रेसच्या शब्दांत...

मन कशात लागत नाही, अदमास कशाचा घ्यावा
अज्ञात झऱ्यावर रात्री मज ऐकू येतो पावा...

पाव शतकाचा रियाझ घडल्यावर अधूनमधून ऐकू लागतो आठवा सूर, अज्ञात पाव्याचा, आणि ‘प्रमेय रुचीस’ येऊ लागते!

# दिलखुलास देश -’फ्रान्स’

मी मूळचा नगर जिल्ह्यातील श्रीरामपूरचा आणि अस्सल मराठी कुटुंबात लहानाचा मोठा झालेला. माझेही बालपण चारचौघांप्रमाणेच गेलेले आहे. अभ्यासात मी बरा होतो आणि नेमून दिलेले काम पूर्ण करायचेच, हा माझा स्वभाव होता. या माझ्या स्वभावानुसार पुरेसा अभ्यास करून मी ‘वाइन टेक्नॉलॉजी’मध्ये पदवी घेतली आणि त्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी ‘एमबीए मार्केटिंग’चा पर्याय निवडून पार पाडला. पदव्युत्तर शिक्षण घेऊन नोकरी करायची वेळ आल्यावर लक्षात आले, की मी ज्या वाइन उत्पादन क्षेत्रात काम करू इच्छित आहे, त्या क्षेत्रात एमबीए मार्केटिंग केल्यावर मला फक्त सरोगसी मार्केटिंग म्हणजेच ‘अप्रत्यक्ष जाहिरात’ (उदा. ‘इंपीरिअल ब्लू - मेन विल बी मेन’) करावी लागणार होती आणि ते मला अजिबातच रुचणारे नव्हते. कारण भारतात वाइन किंवा लीकर उत्पादनांची थेट जाहिरात करण्यास बंदी आहे. त्यामुळे मग वाइन उत्पादन क्षेत्रात काम करावे, हा विचार मनात डोकावू लागला. त्यासाठी वाइन उत्पादनातील उच्च शिक्षण घेणे अपरिहार्य आहे आणि भारतात एकही संस्था वाइन उत्पादनातील उच्च शिक्षण देणारी नाही, ही बाब समोर आली. खरे सांगतो, उच्च शिक्षणाचा विचार करेपर्यंत, परदेशात शिकायला जाऊ, तिथे सेटल होऊ, असे एकही स्वप्न मला केव्हाही पडलेले नव्हते. पण आता पर्यायच नव्हता. त्यामुळे २००१मध्ये मी जगभरात वाइन कॅपिटल म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या फ्रान्समधील बोर्दो येथे जाण्याचा निर्णय घेतला. बोर्दोला कॉलेजमध्ये गेल्यावर पहिल्यांदा धक्का बसला तो शिक्षकांमधील नाते पाहून. एकमेकांना नावाने हाक मारणारे शिक्षक असतात, हेच मुळी मला नवीन होते. इथले शिक्षक सगळ्या विद्यार्थ्यांना छान समजून घेऊन समजून सांगून पुढे नेत. कोणीही कुठलीही संकल्पना मांडो, शंका विचारो, त्याची उत्तरे देण्यासाठी शिक्षक तत्पर होते. प्रयोग करायला वाव होता. सुरुवातीच्या काही दिवसांनी इथे अर्थाजनाची व्यवस्था पाहणे भाग असल्याने मी स्कॉलरशिपसाठी अर्ज केला. पण स्कॉलरशिप फक्त फ्रेंच विद्यार्थ्यांसाठी असल्याचे समजल्यावर, आता काय? असा प्रश्न आ वासून समोर उभा राहिला. त्या वेळी माझ्या शिक्षकांनी मला इंग्रजी शिकवण्याचा पर्याय सांगितला. त्या शिकवण्याच्या बदल्यात माझा खर्च भागेल इतकी रक्कम मला कॉलेजने स्टायपेंडच्या रूपात उपलब्ध करून दिली. स्वातंत्र्य आणि मुक्त वातावरण, आनंद किंवा लक्झरी या फ्रान्सच्या मातीत रुजलेल्या गोष्टी आहेत.या देशात जे आहे ते निगुतीने जोपासून त्यातून उत्पन्न कसे मिळेल, कसे वाढेल आणि त्याचा देशाला कसा उपयोग होईल, याचा काटेकोर विचार केला जातो. हा विचार इथल्या नागरिकांमध्ये रुजावा यासाठी अगदी शाळेपासून



सरकार लक्ष देऊन असते. माझ्या कॉलेजचेच उदाहरण सांगतो. इथे वाइन उत्पादन शिकणारे विद्यार्थी उद्या व्यवसाय जगतात जाणार आहेत, हे लक्षात घेऊन दर चार महिन्यांनी प्रकल्पभेटीचे आयोजन करून तिथे प्रत्यक्ष काम करण्याची संधी दिली जाई. कॉलेजची स्वत:ची वाइन डिस्टिलरी आहे. स्वत:चा ब्रँड आहे. इथे विद्यार्थी उत्पादन, ब्रँडिंग, पॅकिंग अशा विविध कामांचा अनुभव घेतात. चोख काम करा. त्या करताना चुका झाल्या तर होऊ देत. त्यातून तुम्ही शिका, असा इथल्या खाक्या आहे. एक कॉलेज संपल्यावर एका वाइन कंपनीत इंटर्नशिप करण्याची संधी मिळाली. दीड वर्ष त्या कंपनीत झोकून देऊन काम केले. ‘प्रोफेशनल’ म्हणून काम करण्यासाठी मला इथल्या अनुभवांनी प्रचंड बदलून टाकले. मला इंग्रजी बोलता येत असे. सगळ्या भारतीयांप्रमाणे एकाच वेळी चार कामे करण्याचे कौशल्यही होते. त्यामुळे कंपनीच्या उत्पादन, विक्री, जाहिरात आणि अर्थ अशा सगळ्या विभागांत काम केले. हे बघून कंपनीच्या मालकाने अधिकाधिक कामे विश्वासाने माझ्यावर सोपवली आणि गुणवत्तेचे योग्य चीज होणे म्हणजे काय, याचा खराखुरा अनुभव दिला. इथे व्यक्तीच्या कामाला जोखतात. त्याच्या क्षमतांचे कौतुक केले जाते, हा अनुभव मला मिळाला.शिक्षण, नोकरी यासह फ्रान्समधील मित्रमैत्रिणींसह जुळवून घेणे हाही एक भाग होता. हे सारे जण अतिशय स्वतंत्र आणि स्पष्ट; पण दिलखुलासपणे जगणारे होते. त्यांच्यासोबत राहताना येणाऱ्या अनुभवांनी मला विचारांची स्पष्टता द्यायला सुरुवात केली आणि प्रत्येक गोष्टीचा म्हणजे अगदी नात्यांपासन ते प्रोफेशनल कामांच्या पद्धतींपर्यंत सगळ्याचा नव्याने विचार करायला भाग पाडले.या सगळ्या मित्रमैत्रिणींनी मला तिथल्या आचारविचारांशी सहजपणे मला कोणताही न्यूनगंड न देता, चेष्टा न करता परिचय करून दिला. अगदी साध्या गोष्टींचेही मला प्रश्न पडत. काटा-चमच्याने खाता येत नसे. सलाड किंवा चिकन काटा-चमच्याने कसे खायचे, हेच समजेना. काटाचमच्याने खाण्यासाठी बरेच दिवस खटपट करावी लागली. अखेरीस प्रयत्नांनी ते जमले, म्हणजे खरे तर जमवावे लागले. तीच गोष्ट वागण्या-बोलण्याचीही. भारतात सहज होणाऱ्या गोष्टी इथे अगदी अमान्य होत्या. मी पेइंग गेस्ट म्हणून राहत होतो, त्या आजीशी माझी छान मैत्री झाली. तिच्याशी गप्पा मारताना फ्रेंच संस्कृती आणि फ्रेंच माणसाचे राहणे-वागणे मला अधिक उलगडत गेले. ‘फ्रान्समध्ये आपण जे कपडे घालतो, त्या एकूण एक कपड्यांना इस्त्री केली जाते आणि तूही ते कर’ असे ‘बहुमूल्य’ ज्ञान तिने मला दिले. नुसते दिले नाही तर माझ्या एकूण एक कपड्यांना स्वतः इस्त्रीही करून माझ्या ‘फ्रेंच’ होण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकायला लावले. माझ्या सगळ्या फ्रेंच मित्रमैत्रिणींच्या मनात भारताविषयी असंख्य प्रश्न होते. भारतात हत्ती, घोडे, सिंह आहेत ना? भारतात गरिबी प्रचंड का आहे आणि मग तुमचे सरकार काही करीत नाही का? तुमच्याकडे जातिभेद प्रचंड आहे का? महात्मा गांधी आणि इंदिरा गांधी यांना का मारले अशा कित्येक प्रश्नांच्या फैरी फ्रेंच मित्रमंडळी माझ्यावर करू लागली होती. इतिहासाचा सखोल अभ्यास मी या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी फ्रान्समध्ये गेल्यावर केला. ही मंडळी माझ्या घरी येत. मी आमटी भात करून खात असे. त्या वेळी फ्रेंच मित्रमंडळींनी ‘तू फार मसालेदार जेवतोस. तुझ्या घरी आले की ‘करी’चा वास येतो. तू आमच्या सोबत गाडीत आलास तरी ‘करी’चा वास येतो’ असे म्हणून त्यांनी माझ्या घराला ‘करी हाउस’ असे नाव देऊन टाकले होते. यावर काय प्रतिक्रिया द्यावी ते मला कळतच नसे आणि मग हसून गप्प बसत असे. पुढे गाडी घेतली. इथले वाहतुकीचे नियम वेगळे. कार लेफ्ट हँड ड्राइव्ह. ड्रायव्हिंग, ओव्हरटेकिंगच नव्हे, तर रस्त्यावरून गाडी चालवताना माझी गडबड उडायला लागली. शेवटी मराठीमध्ये वाहतुकीचे नियम लिहून गाडीत चिकटवून टाकले. गाडीत बसलो, की आधी नियम पाहायचे असे सुरू केले. मग कुठे गाडी रूळावर आली. दुसरा प्रश्न होता वेळेचा. इथे उन्हाळ्यात सकाळी पाच वाजता सूर्य उगवतो आणि सूर्यास्त रात्री ११ वाजता होतो. दिवस १७ तासांचा आणि रात्र अवघी सहा-सात तासांची. रात्रीचे ११ वाजले तरी सूर्य मावळत नाही, हे माझ्यासाठी नवलाचे होते. अतिप्रचंड उन्हाळा किंवा अतिप्रचंड थंडी इथे नाही. सूर्यप्रकाश असणारा इतका मोठा दिवस असल्याने इथे झाडांची उत्तम आणि भराभर वाढ होते. त्यामुळे निसर्ग समृद्धता विपुल आहे. याचा फायदा वाइन उद्योगाने पुरेपूर करून घेतला आहे. मुळात वाइन शोधली रोमन लोकांनी. कालांतराने ते उत्तर युरोपात आले. आधीच दिलखुलास जगणाऱ्या फ्रेंचांनी आपल्याला मिळालेल्या नैसर्गिक देणगीचा वापर करून वाइन उद्योग इथे रुजवला, वाढवला आणि जगभरात नावाजला जावा यासाठी कष्ट घेतले. त्यासाठी शेतीत प्रयोग केले. फ्रेंचांनी वाइनला प्रतिष्ठा दिली. व्यवसायवृद्धीतून त्यांनी जीवनमान, जीवनशैली अधिक समृद्ध व्हावी, व्यवसायाचा फायदा देशाला व्हावा यासाठी नियोजनबद्ध कष्ट केले. वाइन उत्पादन शिकताना या गोष्टींची नोंद मनात होत होती. यातून माझ्या मनात वाइन उद्योग भारतात कसा रुजवता येईल, त्यासाठी काय करावे लागेल याची चक्रे सुरू झाली. त्यातूनच पुढे वाइन पॉलिसीचा प्रस्ताव मनात रुजला.

# माजलगावात भाजपच्या किल्ल्यात मोठं भगदाड!

# पंकजा मुंडेंचे निष्ठावान कार्यकर्ते भाजपला रामराम; राष्ट्रवादीत प्रवेशाच्या चर्चांना उधाण!



## आता कुणावर विश्वास ठेवायचा?

**माजलगाव | लोकपत्रकार भांगे**

माजलगाव मतदारसंघात भाजपसाठी मोठा धक्का ठरू शकणारी आणि गळफासासारखी टांगती तलवार ठरणारी एक खळबळजनक घटना समोर आली आहे. स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे अत्यंत जवळचे, पंकजाताई मुंडे यांचे विश्वासू आणि दशकानंतर दशक भाजपला वाहून घेतलेले पिता-पुत्र जोडीने आता थेट भाजपला सोडचिठ्ठी दिली असून, पक्षांतराचा निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांकडून मिळते आहे.गेल्या काही दिवसांपासून अस्वस्थ असलेले हे ज्येष्ठ कार्यकर्ते आता थेट राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये जाणार असल्याची जोरदार चर्चा माजलगाव तालुक्यात सुरु आहे. तालुक्यातील प्रत्येक वळणावर, प्रत्येक चौकात, चहाच्या टपरीपासून गावकुसाबाहेरच्या शेतातही याच विषयाची चर्चा आहे – हे जर खरं असेल, तर भाजपला आता मोठी खिंडार पडलीच म्हणून समजा! पंकजाताईंनी राजकारणात घेतलेले निर्णय, स्थानिक कार्यकर्त्यांशी वाढलेले अंतर, आणि मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांकडे दुर्लक्ष, या सर्वाचा स्फोट आता भाजपच्या अंतःकरणात होतोय, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये दिसते.

गोपीनाथ मुंडे यांच्या राजकीय प्रवासात सोबत असलेले हे कार्यकर्ते म्हणजे भाजपची मूळ मुळे होती. ते जर दुसऱ्या पक्षात जात असतील, तर माजलगावात भाजपची पकड उध्वस्त होण्याचा धोका आहे, हे स्पष्ट आहे.

भाजपच्या गडातच जर घरफोड झाली, तर विरोधकांना संधी मिळणार हे स्पष्ट आहे. विशेष म्हणजे, हे कार्यकर्ते अजित पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याचेही बोलले जात आहे. त्यामुळे माजलगाव तालुक्यात सत्तेच्या समीकरणांमध्ये प्रचंड उलथापालथ होण्याचे संकेत आहेत.

या पार्श्वभूमीवर भाजपमधील गटबाजी, दुर्लक्षित होत चाललेले स्थानिक प्रश्न, आणि नेतृत्वातील संवादाअभावी निर्माण झालेली दरी – हे सगळं एकत्रितपणे कार्यकर्त्यांच्या नाराजीला कारणीभूत ठरतंय, हे दिसून येतं. हेच ते कार्यकर्ते ज्यांनी पक्ष विधानसभा लढवली होती आणि पंकजाताई यांनी त्यांना टोल करून एक व्हिडिओ पोस्ट केला होता.

### आज माजलगावात प्रत्येक जण एकच प्रश्न विचारतोय

**गोपीनाथ मुंडेंच्या छायेत वाढलेले कार्यकर्तेच जर निघून गेले, तर 'मुंडे कट्टरपंथी' हा भाजपसाठी शिल्लक तरी राहील का?**

### पंकजाताईंचं नेतृत्व माजलगावात अपयशी ठरतंय का?

**आता ही वाटचाल कुठपर्यंत जाते, हे लवकरच स्पष्ट होईल. मात्र एक गोष्ट निश्चित – माजलगावात भाजपच्या गडात खोलवर भेग पडली आहे. आणि ती भेग आता मतपेटीतून उघड फाटेल का, हे पाहणं रंजक ठरणार आहे.**



**समाजसेविका डॉ.सीमा ओस्तवाल मॅडम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देते प्रसंगी, बीड शहरातील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार व जिव्हाळा बेघर केंद्राचे संचालक, राजू वंजारे, छाया सरोदे, संपादक नितेश उपाध्याय, संपादक बालाजी जगतकर, समाजसेविका एकल महिला संघटनेच्या नेत्यांनी रुक्मिणी नागापुरे, सविता जैन, सुजाता सावंत, किश्किंदा पांचाळ, बाबासाहेब कोकाटे , पत्रकार ज्ञानोबा वायबसे, सामाजिक कार्यकर्ते विजय पोकळे, रवी धोंडगे आदी दिसत आहेत.**

# ज्योतिर्लिंग वैद्यनाथाच्या पिंडीजवळ सेवा बजावताना पुजारी विवेक यांना हृदयविकाराचा झटका;प्रकृती गंभीर

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारच्या दिवशी प्रभू श्री वैद्यनाथ मंदिरात भाविकांची मोठी गर्दी असताना, मंदिराच्या गाभाऱ्यात एक गंभीर व दुःखद घटना घडली. वैद्यनाथाच्या पिंडीजवळ सेवा बजावणारे पुजारी विवेक शंकर गुरव यांना सोमवार, दिनांक २८ जुलै रोजी रात्री सुमारे ९ वाजता अचानक चक्कर येऊन ते कोसळले.

त्यांना तत्काळ मंदिरातील नातेवाईकांनी मदत करून परळीतील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय तपासणीनंतर हृदयविकाराचा तीव्र झटका (हार्ट अटॅक) आल्याचे स्पष्ट झाले असून सध्या त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.



रुग्णालयात अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.विवेक शंकर गुरव हे प्रभू वैद्यनाथाच्या गाभाऱ्यात नित्यनेमाने सेवा बजावत असून, त्यांच्या कार्याला भाविक व सहकारी सेवेकरी वर्गात विशेष मान आहे. अशा सेवाभावी व्यक्तीला आलेल्या आजारामुळे भाविक वर्गात हळहळ व्यक्त होत आहे.दरम्यान, या घटनेनंतर परळी शहरातील सामाजिक, धार्मिक व सेवाभावी क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी रुग्णालयात जाऊन विवेक पुजारी यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्यांच्या लवकर आरोग्यलाभासाठी अनेक ठिकाणी प्रार्थना सुरू आहेत.या घटनेमुळे परळीतील भाविकांमध्ये उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. पुजाऱ्यांच्या कार्यानुभव, तासन्तास सेवा, गाभाऱ्यातील उष्णता आणि मानसिक ताण यामुळे ही स्थिती ओढवली असावी, असे काहींचे मत आहे. तर काही जण मंदिर प्रशासनाच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. सेवेकऱ्यांच्या आरोग्य तपासण्या, विश्रांतीची वेळ, योग्य सुविधा याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही काही भाविकांनी केला आहे.ही घटना मंदिर प्रशासनासाठी एक प्रकारचा इशारा मानली जात आहे.

# एक दिवसीय समता सैनिक दल शिबिर नाथापूर बीड येथे संपन्न

**बीड | प्रतिनिधी**

समता सैनिक दलाचे एक दिवशीय समता सैनिक दल शिबिर नाथापूर येथे घेण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षा, नाथापूरच्या महिला भारतीय बौद्ध महासभेच्या आयुनि. मंगलताई विठ्ठल सोनवणे, वच्छालाताई बिकचंद सिनगारे (सरचिटणीस) तर कार्यक्रमाचे उद्घाटक बीड जिल्हा(प.)महिला अध्यक्षा आयुनि. अरुणाताई निसर्गण व कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक आयु. अमरसिंह ढाका (महाराष्ट्र राज्य संरक्षण सचिव व बीड जिल्हा कोषाध्यक्ष) तसेच गेवराई तालुक्याचे तालुका सरचिटणीस आयु. सुभाष बांगर, आयु. नवनाथ त्रिभुवन (ता. संरक्षण उपाध्यक्ष) हे होते. तर समता सैनिक दलाचे प्रशिक्षक कॅप्टन राजाभाऊ आठवले, मेजर – समता सैनिक दल बिरबटालियन तथा बीड जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष व आयुनि. प्रतिभाताई रंजीत वाघमारे (कंपनी कमांडर तसेच बीड जिल्हा संरक्षण सचिव) हे होते. या समता सैनिक दल शिबिरासाठी ९० महिलांनी व २० पुरुषांनी सहभाग नोंदवून हे बीड तालुक्याचे नाथापूर येथील एकदिवसीय समता सैनिक दल शिबिर यशस्वी केले.



त्याबद्दल नाथापूरकरांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी सकाळी सर्वप्रथम तथागत भगवान बुद्ध यांना पुष्प तर बोधिसत्व परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून तसेच समता सैनिक दलाच्या ध्वजाचे ध्वजारोहण करून त्रिशरण पंचशील घेण्यात आले. नंतर आलेल्या समता सैनिक शिबिरार्थींची नोंदणी करून प्रशिक्षण सुरू करण्यात आले. याप्रसंगी बीड जिल्हा पूर्वचे संस्कार उपाध्यक्ष आयु. के.व्ही. साळवे सर तसेच प्रधान सर नाथापूर जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक हे उपस्थित होते. मोठ्या हर्षोउल्हासात व खेळीमेळीच्या वातावरणात या शिबिराचे प्रशिक्षण घेण्यात आले. जवळजवळ बऱ्याचश्या जातीचे लोक एकेक, दोन-दोन समता सैनिक दलामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन सहभागी झाले. दुपारी दोन वाजेपर्यंत ड्रिल, आत्मसुरक्षा, लाठी काठी व कराटे विषयी प्रशिक्षण देऊन अडीच वाजता भोजन देण्यात आले. व त्यानंतर समता सैनिक दलाची कार्यपद्धती, पूर्वजांचा इतिहास, समता सैनिकाची आचारसंहिता, आयपीसी, फायर फायटिंग, प्रथमोपचार याविषयी माहिती देण्यात आली. शेवटी शिबिरार्थींचे मनोगत घेऊन मनोरंजन पर गीत घेण्यात आले. त्यानंतर समता सैनिक दलाची शपथ व संविधान उद्देशिकेचे पठण करुन शिबिर संपन्न करण्यात आले.

# उद्योगात भरारी; अॅड.प्रकाश कवठेकर यांचा पुरस्काराने सन्मान

## पुण्यात झाले उद्योग गौरव पुरस्काराचे वितरण

**बीड | प्रतिनिधी**

बीड येथील तेजस ग्रुपचे चेअरमन ड.प्रकाश कवठेकर यांनी उद्योग व्यवसायात भरारी घेतली असून पुणे येथील केपीएम मिडियाच्या वतीने त्यांना महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार जाहिर केला होता. या पुरस्काराचा हिंजेवाडी (पुणे) येथे हॉटेल राजमुद्रा येथे दि.२७ जुलै रोजी मोठ्या थाटात वितरण सोहळा संपन्न झाला.



बीड येथील तेजस उद्योग समूहाचे चेअरमन व माजी जिल्हा परिषद सदस्य अॅड.प्रकाश कवठेकर यांना ऑक्सीतेज मिनरल वॉटर या ब्रँड साठी हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तेजस बेवरेजेस या कंपनीच्या अंतर्गत ऑक्सितेज मिनरल वॉटर मार्केटिंग प्रोडक्शन क्व ालिटी हे या कंपनी ने जपले आहे. सर्वसामान्य कुटुंबामध्ये येऊन बीड जिल्ह्यामध्ये स्वत:चा ब्रँड निर्माण करण्याचे काम त्यांनी केले असून तेजस इलेक्ट्रिकल अँड सप्लायर्स, तेजस बेवरेजेस, तेजस इंडस्ट्रीज, तेजस अर्बन, तेजस अर्बन मल्टिनिधी, राजनंदनी अर्थमूव्हर्स इत्यादी कंपनी स्थापन करून शेकडो तरुणांना रोजगार उपलब्ध केला आहे. ही कंपनी ग्रामीण भागात उभा करून शेकडो मुलांना रोजगार उपलब्ध केलेला आहे. हा पुरस्कार सिने अभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या हस्ते ड.प्रकाश कवठेकर यांना देण्यात आला. यावेळी उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. अॅड.कवठेकर यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे.

# महानगर पालिका हद्दीत अनधिकृत मोबाईल टॉवर? नगररचना विभागाची परवानगीच नसल्याचे स्पष्ट

## भर वस्तीत उभारण्यात येणाऱ्या टॉवर विरोधात मनसे आक्रमक

**पनवेल | प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विना परवाना उभारण्यात आलेले मोबाईल टॉवर नागरिकांच्या जीवाशी खेळत आहेत. संबंधित विभागाला माहिती असून सुद्धा आर्थिक हितसंबंध जपत कोणतीही कारवाई केली जात नाही. यातून जीवित हानी झाल्यास संबंधितावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी जनतेतून होत आहे.पनवेल पालिका विभागात रस्ते विभाजक, भाजी मंडई या सार्वजनिक ठिकाणी इंड्स टॉवर लिमिटेड कंपनीकडून मोबाईल टॉवर उभारले जात आहेत. याची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे समोर आले आहे. याबाबत पालिका कार्यालयात चौकशी केली असता अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे मिळत आहेत. कळंबोली येथील खैरेश्वर मिठाई दुकाना समोरील रस्त्यावरील विभाजकावर भर लोकवस्तीत मोबाईल टॉवर उभारण्यात येत असून त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार आहे. या टॉवर विरोधात कळंबोली मनसेने पदाधिकाऱ्याने आंदोलन केले होते. त्यामुळे तो टॉवर अद्याप पर्यंत चालू करण्यात आला नाही. त्याच प्रमाणे कामोठे येथील मोबाईल टॉवर विरोधात नागरिकांनी आक्रमक भूमिका घेत येथील मोबाइल टॉवरचा वीजपुरवठा खंडित करावा अशी मागणी महावितरण कंपनीकडे केली आहे. हे टॉवर बंद करण्यात यावेत अशी तक्रार महापालिकेकडे केली आहे. विशेष म्हणजे कळंबोली मधील सेक्टर १०, भुखंड क्रमांक २६ हा सिडको प्रस्तावित मार्केट म्हणून आरक्षित असून त्याचे सुशोभिकरण करण्यासाठी पालिकेकडून निधी मंजूर करण्यात आला आहे. या भूखंडावर विना परवाना मोबाईल टॉवर उभारण्याचे काम इंड्स टॉवर लिमिटेड कंपनीकडून सुरू करण्यात आले आहे. कमी जागेत उभे करण्यात येत असलेल्या या मार्केटमध्ये टॉवर उभा करण्यात येत असल्याने मार्केटसाठी जागाच शिल्लक राहणार नाही. त्यामुळे येथील नागरिकात प्रचंड नाराजी असून त्यांनी मोबाईल टॉवरला विरोध केला आहे. नागरी वस्तीत, मार्केट मध्ये मोबाईल टॉवर उभे करण्यात येत आहेत. त्याला नागरिकांत तीव्र असंतोष आहे. याबाबत प्रभाग अधिकारी यांना विचारले असता ते अनभिज्ञ आहेत. आणि एकमेकाकडे बोट दाखवत आहेत.

# आर्य वैश्य समाजातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षे कडे देखील आपले ध्येय म्हणून बघावे-गादेवार

## केज येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार व अमृत महोत्सव संपन्न

**केज । प्रतिनिधी**

आर्य वैश्य समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा ओढा इंजिनिअरिंग, डॉक्टर व सी ए याकडे आहे ही चांगली बाब आहे पण आता या पलीकडे जाऊन आता स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून मोठ्या पदांवर कार्य करण्याची महत्वाकांक्षा देखील बाळगावी लागेल ती काळाची गरज आहे असे स्पष्ट मत महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांनी व्यक्त केले ते बीड जिल्हा महासभेच्या वतीने केज येथे आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार व पंच्याहत्तर वर्ष पूर्ण केलेल्या व्यक्तींच्या अमृत महोत्सव सोहळ्या प्रसंगी बोलत होते.

केज येथील श्रीराम मंगल कार्यालयात रविवार दि.२७ जुलै रोजी आयोजित या सोहळ्यास अध्यक्ष म्हणून नंदकुमार गादेवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून गोविंद बिडवई,प्रदीप मनाठकर,सदानंद मेडेवार हे होते.तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.सतीष साळुंके व अमृत चे मराठवाडा व्यवस्थापक सुशांत देशपांडे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना गादेवार म्हणाले कि,पारंपारिक उद्योगांना थोडेसे बाजूला करत मागील काही वर्षात आपल्या समाजातील विद्यार्थ्यांनी डॉक्टर,सी. ए,इंजिनिअर,आय टी क्षेत्रात आपले करिअर निवडले आता या सोबतच आणखी नवीन दिशांची निवड देखील करावी लागणार आहे. यात आता विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांकडे लक्ष केंद्रित करत शासनाच्या मोठ्या पदांवर देखील विराजमान होणे गरज असल्याचे सांगितले तसेच समाजातील पंचाहत्तरी पूर्ण केलेल्या व्यक्तींचा अमृत महोत्सव सार्वजनिक मंचावर साजरा होणाऱ्या या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमातून त्यांचा सत्कार करता येण्याचे भाग्यआपणास मिळाल्याचा आनंद असल्याचे त्यांनी नमूद केले.आपल्या आई वडिलांचा उतारवयात सांभाळ करणे ही आपली सनातनसंस्कृती आहे त्यामुळे त्यांना कोणीही एकटे अथवा वृद्धाश्रमात सोडू नये अशी विनंतीही त्यांनी यावेळी केली समस्त समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र तिरुपती येथे पंचेवीस



कोटी रुपये खर्च किंमतीच्या होऊ घातलेल्या निवासी संकुलाची ईमारत देखील दीड वर्षात पूर्ण करू अशी ग्वाही देत यासाठी समाज बांधवांनी योगदान द्यावे असे आवाहनही या प्रसंगी केले.

समाजात सहिष्णुतेची, ममतेची व माणुसकीची पेरणी आपल्या प्रत्येकाच्या घरात असलेली जेष्ठ मंडळी करत असतात.भावी पिढीच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा असतो ते चालते बोलते संस्कार पीठ असतात. त्यामुळे जेष्ठांना जपा कारण आता पूर्वीप्रमाणे शाळांमधून संस्कार हा विषय ईतिहास जमा झाला आहे असे डॉ. सतीष साळुंके यांनी सांगत सार्वजनिक मंचावरून जेष्ठांचा अमृत महोत्सव घेण्याच्या संकल्पनेचे तोंडभरून कौतुकही केले.शासनाच्या वतीने वर्षभरापूर्वी चालु करण्यात आलेल्या अमृत योजनेच्या माध्यमातून उद्योगा पासून ते विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य करण्या साठी असलेल्या विविध योजनांची माहिती व त्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती अमृतचे मराठवाडा व्यवस्थापक सागर देशपांडे यांनी यावेळी दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष सूर्यकांत महाजन यांनी करत जिल्हा महासभे च्या एकूणच कार्याचा व या कार्यक्रम घेण्या मागची भूमिका यावेळी विषद केली.

अपघातात आपलेदोन्ही हात गमावलेल्या वैभव पईतवार या धारूर येथील युवकानेआपल्या अपंगत्वावर मात करत एमपीएससी स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल त्याचा विशेष असा सत्कार यावेळी करण्यात आला कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने करण्यात आली तर समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. कार्यक्रमासाठी जिल्हा भरातून तीनशे ते चारशे समाजबांधवांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रमोद बिडवई यांनी केले तर आभार प्रदर्शन जिल्हा सचिव अजय रुद्रवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी प्रोजेक्ट चेअरमन सुहास चिद्रवार,वैभव झरकर,बालाजी बासटवार,गणेश डुबे, प्रकाश कामाजी,अमित कामाजी यांच्यासह केज येथील समाज बांधवांनी विशेषपरिश्रम घेतले.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई शाखा-केज यांच्या वतीने नवनिर्वाचित पत्रकार पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई शाखा-केज यांच्या वतीने नव निर्वाचित पत्रकार पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ शासकीय विश्रामगृह,केज येथे मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमात प्रकाशपर्व न्यूज पोर्टल बीड जिल्हा संपादक पदी लिंबराज शंकरराव गायकवाड,दैनिक वादळ वार्ता बीडजिल्हा संपादक पदी कपिल अंबादास मस्के आणि पुरोगामी पत्रकार संघ बीड जिल्हाध्यक्ष पदी रणजित तात्याराम घाडगे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला


या कार्यक्रमास केज तालुक्यातील विविध पत्रकार संघटनांचे पदाधिकारी व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, शाखा केजचे



तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील हे होते.त्यांच्या सोबत तालुकाउपाध्यक्ष प्रदीप गायकवाड, पांडुरंग कसबे,नंदूलाल मिसाळ,पुरोगामी पत्रकार संघ केज तालुकाध्यक्ष दिनकर जाधव,सक्रिय पत्रकार संघ केज तालुकाध्यक्ष संतोष गालफाडे, सह्याद्री पत्रकार संघ केज तालुकाध्यक्ष अनिल ठोंबरे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात पत्रकार धनंजय कुलकर्णी, मुब्बशीर खतीब,सचिन भालेराव,महादेव काळे, दीपक नाईकवाडे, दत्तात्रय मुजमुले, बाळासाहेब जाधव, सुहास चिद्रवार,अनिल वैरागे,संभाजी ब्रिगेडचे राहुल खोडसे,पत्रकार मनोराम पवार,दिलीप खाडे,सचिन लांडगे, मुनीर कुरेशी,कल्याण मस्के,बलभीम मस्के, लक्ष्मण ओव्हाळ, भगवंत वायबसे,दत्ता गायकवाड सर,सरपंच शशिकांत इंगळे,लक्ष्मण ओव्हाळ,भगवंत वायबसे,आश्रुबा खरात यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्र संचालन दैनिक वादळ वार्ताचे संपादक अजय भांगे यांनी केले.तसेच प्रास्ताविक पांडुरंग कसबे यांनी तर आभार प्रदर्शन चंद्रकांत पाटील यांनी केले.सत्कारमूर्ती कपिल मस्के,रणजित घाडगे आणि लिंबराज गायकवाड यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.सत्कारप्रसंगी शाल, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व पेन देऊन नव निर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी उपस्थितांचे योगदान व उपस्थितीमुळे समारंभ यशस्वीरीत्या पार पडला.

# मुंब्रा डोंगरामध्ये अडकलेल्या मुलांची अखेर सुखरूप सुटका



**ठाणे । प्रतिनिधी**

दिनांक २७/०७/२०२५ रोजी रात्री १० :२२ वाजताच्या सुमारास आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे प्राप्त झालेल्या घटनेच्या माहितीनुसार मुंब्रा अग्निशमन केंद्र, दालम बंगल्याजवळ, आदिवासी पाडा, गावदेवी, मुंब्रा बायपास, मुंब्रा, ठाणे. या ठिकाणी दुपारी सुमारे ३ वाजताच्या सुमारास आदिवासी पाडा, गावदेवी या ठिकाणी डोंगरामध्ये ०५ मुले फिरण्याकरिता गेली असता त्यांना परतीचा मार्ग न मिळाल्याने डोंगरामध्ये अडकली होती. सदर घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान ०१- रेस्क्यू वाहनासह, मुंब्रा प्रभाग समिती मधील आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१- पीकअप वाहनासह व मुंब्रा पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सदर घटनास्थळी कोणालाही दुखापत नाही.सदर डोंगरामध्ये अडकलेल्या मुले १) सय्यद अयुब. (पु./वय- १८ ), २) शोएब खान. (पु./वय- १८, ३)अमूर खान. (पु./वय- १८) ४) अरहान खान. (पु./वय- १८) व ५) मुददशीर गुफारे. (पु./वय- १८) राहणार सर्व मुंब्रा. सदर घटनास्थळी डोंगरामध्ये अडकलेल्या मुलांची रात्री ११:३० वाजताच्या सुमारास अग्निशमन दलाचे जवान व स्थानिक नागरीक यांनी सुखरूप सुटका केली असून सदर मुलांना मुंब्रा पोलीस कर्मचारी यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# दिल्ली येथील विश्व मानवाधिकार संरक्षण आयोगाच्या वतीने भाऊसाहेब घोडके यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब घोडके रा.दिंद्रुड ता.माजलगाव जि बीड महाराष्ट्र यांना दि.२६ जुन २०२५रोजी विश्व मानव अधिकार सुरक्षा आयोगाने डॉक्टरेट पदवी सन्मान अवार्ड जाहीर केला तो सन्मान प्रदान सोहळा दि.२५ जुलै २०२५ रोजी भाऊसाहेब लक्ष्मण घोडके यांना सामाजिक जन सेवा अन्याय अत्याचार, भ्रष्टाचार विरोधी,अन्य समाजसेवा,गौ रक्षक, बेटी बचाओ बेटी पढ़ाओ असे अनेक सामाजिक कार्य केल्या बद्दल त्यांची दखल घेत WORLD HUMAN RIGHTS PROTECTION COMMISSION (विश्व मानवधिकार संरक्षण आयोग दिल्ली) ने दखल घेतली दिल्ली येथील नेताजी सुभाष पॅलेस येथे विश्व मानवधिकार संरक्षण आयोगाच्या वतीने भाऊसाहेब घोडके यांना विश्व मानवधिकार संरक्षण आयोगाने आजीवन सदस्य नामांकित केले त्या बरोबर डॉक्टरेट अवॉर्ड,व्हिजेटींग कार्ड, पुरस्कार पत्र,लोगो,सह शोशल वर्क



डॉ.पदवी प्रदान करताना डॉ.कविता बजाज सिईओ विश्व मानवधिकार संरक्षण आयोग,सुशिल कुमार प्रबंध निदेशक विश्व मानवधिकार संरक्षण आयोग,नेहा यादव शाखा प्रबंधक विश्व मानवधिकार संरक्षण आयोग,सुश्री ज्योती गौतम वरीष्ठ जनसंर्पक अधिकारी,श्री. भाऊसाहेब घोडके संघटना पदावरील काम चालु आहे.राष्ट्रीयप्रवक्ता गुरु रविदास विश्व महापीठ,प्रदेश अध्यक्ष भारतीय नरेंद्र मोदी संघ,प्रदेश अध्यक्ष राष्ट्रीय बेटी बचाओ बेटी पढ़ाओ,महाराष्ट्र प्रदेश मंत्री बृजवासी गौ रक्षक सेना,सदस्य योगी आखाडा दिल्ली, जिल्हाध्यक्ष बीड राष्ट्रीय चर्मकार संघ,प्रदेश युवाध्यक्ष भ्रष्टाचार विरोधी जनआक्रोश, प्रदेश अध्यक्ष भारत किसान मजदूर संघटन, अशा अनेकसंघटनांच्या पदाच्या माध्यमातुन समाज सेवा करत आहेत.त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. डॉ.भाऊसाहेब घोडके यांना डॉक्टरेट पदवी मिळाल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.

# नागपंचमी निमित्त चिखलबीडच्या कुस्तीत चौरे बाळासाहेब चमकले

## ऊसतोड मजुराच्या लेकराने पटकावली चांदीची गदा!

**बीड । लोकपत्रकार भांगे**

आज नागपंचमीच्या निमित्ताने बीड जिल्ह्यातील चिखलबीड या डोंगराच्या कुशीत वसलेल्या गावात वर्षानुवर्ष चालत आलेल्या कुस्ती परंपरेला पुन्हा एकदा उजाळा मिळाला. पूर्वी भांडणांनी मळवलेल्या या गावाने यंदा मात्र एकजुटीने मातीच्या आखाड्यात महाराष्ट्रातील मातीतल्या केसरीसह डावरंगत कुस्ती स्पर्धेचं भव्य आयोजन केलं.या पारंपरिक कुस्ती महोत्सवाला माजलगाव मतदारसंघातील आजी-माजी नेत्यांनी उपस्थिती लावली. गावकऱ्यांसह पंचक्रोशीतील शेकडो कुस्तीप्रेमींनी गर्दी करत या मातीतल्या रांगड्या खेळाला प्रचंड प्रतिसाद दिला.स्पर्धेतील शंभरावर लढतींमध्ये शेवटची व सर्वाधिक लक्षवेधी कुस्ती ठरली ती चौरे बाळासाहेब याची. जिवाच्या आकांताने झुंज देत या ऊसतोड मजुराच्या लेकराने



अंतिम कुस्ती जिंकली आणि बक्षीस म्हणून २१,५०० रुपये व प्रतिष्ठेची चांदीची गदा मिळवली.अखेरच्या क्षणी घामाने भिजलेला चौरे बाळासाहेब विजयानंतर आनंदाने हसला आणि उपस्थितांनीही टाळ्यांच्या कडकडाटात त्याचं जोरदार अभिनंदन केलं.

हा चौरे चिखल बीडच्या लोकनेते गोपीनाथराव मुंडे व्यायाम शाळा येथे मारुतीराव मुंडे वस्ताद यांच्याच तालमीत शिकलेला पट्ट्या या क्षणी केवळ मातीच नव्हे, तर एक गाव, एक संघर्ष, आणि एका मजुराच्या पोराचं स्वप्न जिंकलं होतं.

# समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षपदी चंद्रकांत पाटील तर पुरोहित कल्याण समितीच्या मराठवाडा अध्यक्षपदी अनंत देवा कोकीळ यांची निवड

**केज । प्रतिनिधी**

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या वतीने वेळोवेळी केलेले आंदोलने व सामाजिक कार्याची व्याप्ती वाढवण्यासाठी समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती संघटनात्मक बांधणी करत असून संस्थापक अध्यक्ष श्री.धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दिनांक २९ जुलै रोजी समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षपदी चंद्रकांत पाटील यांची नियुक्ती करण्यात आली तसेच समस्त समाज संघर्ष समिती अंतर्गत ब्राह्मण समाज पुरोहित कल्याण समितीच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षपदी वेद शास्त्र संपन्न श्री.अनंत देवा संजीवनराव कोकीळ यांची नियुक्ती करण्यात आली तसे नियुक्ती पत्र ब्राह्मण समाज पुरोहित कल्याण समिती चे प्रदेशाध्यक्ष श्रीनिवास केजकर यांनी दिले. समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती च्या माध्यमातून महाराष्ट्र सरकारकडे वेळोवेळी निवेदने,वेगवेगळे आंदोलने करण्यात आली याचा परिणाम म्हणून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री सोबत तीन वेळा बैठका झाल्या. तसेच वेगवेगळी आंदोलने करण्यात आली.यामध्ये धरणे आंदोलन आझाद मैदानावरील आंदोलन, मोटरसायकल रॅलीमोर्चा पळी ताम्हण वाजून केलेले आंदोलन, उपोषण आदी आंदोलने करण्यात आली संपूर्ण महाराष्ट्रभर याचीव्याप्ती झाली होती समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या सोबत ब्राह्मण



समाजाच्या इतर संघटना ही आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.संपूर्ण ब्राह्मण समाजाच्या कल्याणासाठी नियमितपणे संघर्ष समिती कार्य करेल ब्राह्मण समाजाच्या उर्वरित मागण्या पुरोहितांना मानधन, ब्राह्मण संरक्षण कायदा प्रत्येक जिल्ह्यात विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह मंदिरावरील सरकारचे नियंत्रण काढणे,वेदपाठ शाळांना मानधन देणे, आदी उर्वरित मागण्या साठी ब्राह्मण समाज संघर्ष समिती कार्य करणार आहे यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर संघटनात्मक बांधणी करत आहे याचाच भाग म्हणून मराठवाडा अध्यक्षपदी चंद्रकांत पुरुषोत्तमराव पाटील यांची नियुक्ती करण्यात आली तर ब्राह्मणसमाज पुरोहित कल्याण समितीच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षपदी अनंत देवा संजीवनराव कोकीळ यांची नियुक्ती करण्यात आली.यावेळी धनंजय कुलकर्णी, श्रीनिवास केजकर, शिवराज मुथळे,श्रीधर खोत,गजानन औसेकर उपस्थित होते.लवकरच संपूर्ण महाराष्ट्राची संघटनात्मक बांधणी पूर्ण होईल असाविश्वास धनंजय कुलकर्णी यांनी यावेळी व्यक्त केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077